पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे - १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र.२

सभावृत्तांत

दिनांक २१/०२/२०१४ वेळ दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दि. २१/०२/२०१४ रोजी दुपारी १२.०० वाजता ड क्षेत्रिय कार्यालयाच्या छत्रपती शाहू महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. सदर सभेस पुढीलप्रमाणे सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.अनिता तापकीर | अध्यक्ष, |
| २. | मा.विनोद नढे | सदस्य |
| ३. | मा.कैलासभाऊ थोपटे | सदस्य |
| ४. | मा.गौतम चाबुकस्वार | सदस्य |
| ५. | मा.विलासराव नांदगुडे | सदस्य |
| ६. | मा.बापु काटे | सदस्य |
| ७. | मा.राजेंद्र जगताप | सदस्य |
| ८. | मा. सुनिता वाघेरे | सदस्या |
| ९. | मा.उषा वाघेरे (पाटील) | सदस्या |
| १०. | मा.विमल काळे | सदस्या |
| ११. | मा.निता पाडाळे | सदस्या |
| १२ | मा.आरती चोंधे | सदस्या |
| १३. | मा.वैशाली जवळकर | सदस्या |
| १४ | मा.शकुतला धराडे | सदस्या |

याशिवाय मा.पी.एच.झुरे, प्रभाग अधिकारी, मा.मनोज लोणकर, प्रशासन अधिकारी, सभा शाखा, मा.गुलाब दांगट, कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा. चव्हाण एस.एस. कार्यकारी अभि यंता विदयुत मा. रत्नपारखी, उपअभियंता स्थापत्य,.मा.रविंद्र पवार, उपअभियंता जलनिसारण विभाग, मा.शेख, उपअभियंता पाणीपुरवठा विभाग, मा.व्ही. एम. इंगुळकर लेखाधिकारी, मा.व्ही.के..बेंडाळे सहा. आरोग्याधीकारी इत्यादी अधिकारी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस मा.अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

तदनंतर मा.अध्यक्ष यांनी मागील कार्यपत्रीका क्रमांक १०,दिनांक १३/१/२०१४, कार्यपत्रीका क्रमांक ११ दिनांक १८/१/२०१४ तसेच कार्यपत्रीका क्रमांक १, दिनांक ६/२/२०१४ रोजीच्या सभेचा सभावृत्तांत कायम करण्यात आल्याचे प्रकट केले..

तदनंतर मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने व मा.सदस्य यांचे मागणीप्रमाणे खाली नमुद केलेप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक १. ड प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या शुक्रवारी दुपारी १२.०० वाजता ठरविणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव

विषय क्रमांक २ पी.डब्ल्यू.डी. २/१ साईनगर स्टीलच्या अपोझीट शिव शक्ती माता मंदिर याठिकाणावरील सार्वजनिक शौचालय ब्लॉक तोडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतविचार करणे मा.सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३ पिंपरी गावातील शंकर मंदिरासमोरील काळेवाडी ब्रीज सार्वजनिक शौचालय ब्लॉक तोडणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे मा. सुनिता वाघेरे यांचा प्रस्ताव .

विषय क्रमांक ४ प्रभाग क्रमांक ४५ पिंपरीवाघेरे शिंदे आळी येथील विठोबा नाणेकर यांचे घराजवळून वाघेरे कॉलनीकडे जाणा-या रस्त्याला कै.सौ. रखमाबाईविठोबा नाणेकर पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतविचार करणे मा.उषा वाघेरे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५ कमान उभारणेस मान्यता देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतविचार करणे मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६ पिंपळेनिलख येथील शाळेस नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतविचार करणे मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ७ पिंपळेनिलख येथील उदयानास माजी महापौर प्रभाकर नारायण साठे यांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतविचार करणे मा.विलासराव नांदगुडे यांचा प्रस्ताव.

ठराव क्रमांक २ विषय क्र.१

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – प्रशासन

सुचक - मा. आरती चोंधे अनुमोदक - मा. निता पाडाळे

संदर्भ :- मा. आरती चोधे यांचा दिनांक २१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

ड प्रभाग समितीची सभा प्रत्येक महिन्याचे पहिल्या शुक्रवारी दुपारी १२.०० वाजता आयोजित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ३ विषय क्र.२

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ :- मा. सुनिता वाघेरे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पी.डब्लू.डी.२/१ साईनगर स्टीलच्या समोरील शिवशक्ती माता मंदीर परिसरातील सार्वजनिक शौचालय हे रहदारीच्या व वहिवाटीच्या परीसरात असून शौचालयाची दुरावस्था झालेली आहे. त्यामुळे दुर्गधी व आरोग्यविषयक समस्या निर्माण होत आहे व नागरीकांना होणा-या त्रासाला सामोरे जावे लागत आहे व शिव शक्ती माता मंदिराचा पवित्र परिसर दुषीत होत आहे. तरी तेथील सार्वजनिक शौचालय त्वरीत पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ४ विषय क्र.३

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.निता पाडाळे अनुमोदक – मा.विमल काळे

संदर्भ :- मा. सुनिता वाघेरे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपरी गावांतील शंकर मंदीरासमोरील (काळेवाडी पुल) परीसरातील प्रत्येक घरामध्ये स्वत:चे शौचालय आहे, त्यामुळे सार्वजनिक शौचालयाचा वापर कमी असून अस्वच्छता व अव्यवस्था आणि आरोग्यविषयक समस्यानिर्माण होत आहे सबंधीत परीसर हा मंदिराचा असून तेथे मच्छर , दुर्गंधी अस्वच्छतेचे वातावरण निर्माण होत आहे म्हणून येथील सार्वजनिक शौचालय पाडणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानमुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ५ विषय क्र.४

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.उषा वाघेरे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ :- मा.उषा वाघेरे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक ४५ पिंपरीवाघेरे शिंदे आळी येथील विठोबा नाणेकर यांचे घराजवळून वाघेरे कॉलनीकडे जाणा-या रस्त्याला कै.सौ. रखमाबाई विठोबा नाणेकर पथ असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ६ विषय क्र.५

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.उषा वाघेरे

संदर्भ :- मा.आरती चोंधे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक ५४ पिंपळेनिलख येथे पिंपळेनिलख गावांत प्रवेश करतांना सुशोभीत अशी स्वागत कमान उभारणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ७ विषय क्र.६

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ :- मा.आरती चोंधे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक ५४ पिंपळेनिलख मधीलपिंपरीचिंचवड महानगरपालिका शाळा क्रमांक ५२ मुलांची या शाळेला कै.सोपानराव नथोबा इंगवले (मा.पोलिस पाटील) व पिंपरी चिंचवड महानगरपालिका शाळा क्रमांक ५३ मुलींची या शाळेला स्वातंत्र्य सैनिक कै.भाऊसाहेब नथोबा साठे (मा.सरपंच पिंपळेनिलख) असे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक ८ विषय क्र.७

दिनांक २१/०२/२०१४ विभाग – स्थापत्य

सुचक –मा.विलासराव नांदगुडे अनुमोदक – मा.गौतम चाबुकस्वार

संदर्भ :- मा.विलासराव नांदगुडे यांचा दि.२१/२/२०१४ रोजीचा प्रस्ताव

पिंपळेनिलख येथील उदयानास माजी महापौर प्रभाकर नारायण साठे यांचे नांव देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
( अनिता मच्छिंद्र तापकीर )
**सभापती**
ड प्रभाग समिती पिं.चिं.म.न.पा.,
रहाटणी ४११०१७

क्रमांक – ड/१३/कावि/ ४५ /२०१४
दिनांक – ०९ /०५ /२०१४

**सही/-**
**प्रशासन अधिकारी तथा**
सचिव (सभाशाखा)
ड प्रभाग समिती

प्रत - सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.